पुढारी
# आपलं कोल्हापूर
रविवार, दि. २१ मार्च २०१०



कमला कॉलेजमध्ये कार्यक्रमात बोलताना डॉ. अनिल सूर्यवंशी. सोबत मान्यवर.

## एम. बी. ए. ची पूर्वतयारी असल्यास हव्या त्या इन्स्टिट्यूटमध्ये प्रवेश शक्य

### प्रा. डॉ. सूर्यवंशी

कोल्हापूर : कमला महाविद्यालयाच्या कॉमर्स फोरममार्फत विद्यार्थिनींसाठी एम. बी. ए. ची पूर्वतयारी या विषयावर अशोकराव माने ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटच्या एम. बी. ए. विभागाचे सहायक प्राध्यापक डॉ. अनिल सूर्यवंशी यांचे व्याख्यान आयोजित केले होते. स्पर्धा परीक्षा आणि व्यावसायिक अभ्यासक्रम करताना द्याव्या लागणाऱ्या परीक्षांची सांगड कशी घालावी व त्यातून कशापद्धतीने यश मिळविता येईल त्याचबरोबर गट चर्चा आणि वैयक्तिक मुलाखत आणि इंग्रजी संभाषणाची व कलागुणांची आवश्यकता यावर भर दिल्यास चांगले गुण प्राप्त करता येतात आणि हव्या त्या इन्स्टिट्यूटमध्ये प्रवेश सहज घेता येतो. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील यांचे मार्गदर्शन घेण्यात आले. प्रास्ताविक वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. एस. व्ही. बागल यांनी केले. प्रा. डॉ. सौ. वर्षा मैंदर्गी यांनी आभार मानले.